# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**२०२२**

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक १८.०४.२०२२

**सानपाडा, नेरुळ व खारघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये बेकायदेशिर अंमली पदार्थ विकी करणारी महिला व पुरुष यांचेवर अंमली पदार्थ विरोधी पथकाने विशेष मोहिम अंतर्गत कारवाई केलेबाबत.**

---

मा. श्री.बिपिन कुमार सिंग, पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या नशामुक्ती अभियानाचे अनुशंगाने मा.डॉ.श्री.जय जाधव, पोलीस सह आयुक्त, मा.श्री.महेश घुर्ये, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री.सुरेश मेंगडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा), मा. श्री. विनायक वस्त, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांनी नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई चे पोलीस पथक नवी मुंबई नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ विक्री व सेवन करणा—या इसमांविरुध्द कारवाई करण्यासाठी प्रयत्नशिल होते. त्या अनुषंगाने —

**(१) दि. १७/०४/२०२२ रोजी सानपाडा पोलीस ठाणे** हद्दीत सानपाडा ब्रिजचे खाली, सायन पनवेल रोड नवी मुंबई येथे एक इसम मोटार कार मधुन गांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस सय्यद, व त्यांचे पथकाने मिळालेल्या माहिती नुसार सानपाडा ब्रिजच्या खाली पनवेल सायन हायवे रोड जवळील मनमोहन मिठाई दुकानाचे समोर रोडवर सेक्टर ३० ए नवी मुंबई या ठिकाणी पाळत ठेवुन इसम नामे वाजिद अब्दुललतीफ खान वय ३१ वर्षे धंदा रिक्षा चालक रा. अन्वर मस्जिद जवळ, प्लॉट नंबर ३१, रूम नंबर ८, लाईन नंबर एम, रोड नंबर ३, शिवाजी नगर, गोवंडी मुंबई. हा त्याचे ताब्यातील मोटर कारसह मिळुन आला. त्याचे ताब्यात १,३७,५०० /— रू. किं. ०५ किलो ५०० ग्रॅम वजनाचा गांजा, २८,०००/— रूपये किंमतीचा वन प्लस कंपनीचा मोबाईल फोन, ५००/— रूपये रोख रक्कम व १,७५,०००/— रूपये किं. होंडा सिव्हिक कार पांढ—या रंगाची कार एकुण किंमत ३,४२,०००/— रूपये. सदर आरोपी विरूध्द **सानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ५७/२०२२ एन.डी.पी.एस.कायदा कलम ८(क), २०(ब)** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**(२) दि. १५/०४/२०२२ रोजी नेरूळ पोलीस ठाणे** हद्दीत, सेक्टर २०, सावित्री बिल्डींगच्या मागील बाजुस, बालाजी झोपडपट्टीतील पाईपलाईनच्या बाजुला झोपडीमध्ये राहणारी महिला नामे शोभा सुभाष काळे ही गांजा विक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस सय्यद, व पथक यांनी दिनांक १५/०४/२०२२ रोजी १५.४५ वाजताच्या सुमारास छापा टाकला असता सदर महिलेच्या ताब्यात ८१० ग्रॅम गांजा किंमत १६,२००/—रू व रोख रक्कम रु.२५०/— असा एकुण १६,४५०/— चा माल मिळुन आल्याने तिला ताब्यात घेवुन **नेरूळ पोलीस ठाणे गुन्हा रजिष्टर नंबर १४२/२०२२ एनडीपीएस अधिनियम कलम ८(क),२०(ब)** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**(३) दि. १०/०४/२०२२ रोजी खारघर पोलीस ठाणे** हद्दीत, आदिवासीवाडी झोपडपट्टी, सेक्टर ३, बेलपाडा गाव, नवी मुंबई येथे झोपडीमध्ये राहणारी महिला नामे अफसाना उर्फ

रुक्साना आजिज शेख ही गांजा विक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस सय्यद, व पथक यांनी दिनांक १०/०४/२०२२ रोजी १६.४५ वाजताच्या सुमारास छापा टाकला असता सदर महिलेच्या ताब्यात ५६० ग्रॅम गांजा किंमत १४,०००/—रू व रोख रक्कम रु.११००/— असा एकुण १५,१००/— चा माल मिळुन आल्याने तिला ताब्यात घेवुन **खारघर पोलीस ठाणे गुन्हा रजिष्टर नंबर ९७/२०२२ एनडीपीएस अधिनियम कलम ८(क),२०** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| **अ.** | **गुरजिनं कलम** | **अटक आरोपी** | **जप्त मुद्देमाल** | **एकुण किंमत** |
|---|---|---|---|---|
| १ | सानपाडा पोलीस ठाणे गुरजि.नं. ५७/२२ एन.डी.पी.एस.कायदा कलम ८(क), २०(ब) | वाजिद अब्दुल लतीफ खान वय ३१ वर्षे धंदा रिक्षा चालक | ५ किलो ५०० ग्रॅम गांजा, १ होंडा कार १ मोबाईल व रोख रक्कम | **३,४२,०००/—** |
| २ | नेरूळ पोलीस ठाणे गुरजि.नं. १४२/२२ एनडीपीएस अधि. कलम ८(क),२०(ब) | शोभा सुभाष काळे | ८१० ग्रॅम गांजा व रोख रक्कम | **१६,४५०/—** |
| ३ | खारघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ९७/२२ एनडीपीएस अधिनियम कलम ८(क),२० | अफसाना उर्फ रुक्साना आजिज शेख | ५६० ग्रॅम गांजा व रोख रक्कम | **१५,१००/—** |
| **एकुण** | | **३ आरोपी** | **६ किलो ८७० ग्रॅम गांजा** | १,६७,७००/— |
| | | | **रोख रक्कम, १ होंडा कार, १मोबाईल फोन** | २,०५,८५०/— |
| **एकुण रक्कम** | | | | ३,७३,५५०/— |

सदरची कारवाई अंमली विरोधी कक्षाचे वपोनि बी.एस. सय्यद व पोउनिरी विजय शिंगे, सहा.पो.उप निरी. सलीम इनामदार, पोहवा/१२५४ दिपक कांबळे, पोहवा/१२०२ कासम पिरजादे, पोहवा/१३७७ रमेश तायडे, पोहवा/१३०१ रमेश उटगीकर, पोहवा/५७८ संतोष गायकवाड, पोना/४१८६ महेश अहिरे, मपोना/२७९४ हेमांगी पाटील व पोहवा/४१८६ राकेश अहिरे यांनी केलेली आहे.

सदरचे नशामुक्ती अभियानाअंतर्गत यापुढेही सतत अंमली पदार्थ विरोधी कारवाई करण्यात येत आहे.

-------------